Pages 39-53 | http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 4, April 2021, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# DALIT PANTHAR UDAY, VATCHAL ANI PATAN



**NARWADE JALBA MESHRAM**

**ARTS, SCIENCE & COMMERCE MAHAVIDYALAYA,**

**BADNAPUR, DIST. JALNA**

**Email ID : narwadejm@gmail.com**

*Impact Factor = 4.153 (2018), Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.*

# "दलित पँथर उदय, वाटचाल आणि पतन"

**नरवाडे जळबा मेश्राम**
**कला, विज्ञान व वाणिज्य**
**महाविद्यालय, बदनापूर, जि. जालना**
**इमेल :- narwadejm@gmail.com**

**प्रस्तावना :**

आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीतला सुवर्ण काळ म्हणजे 'दलित पँथर' चा काळ होय. दिनांक २९ मे १९७२ रोजी दलित पँथरचा जन्म झाला आणि ७ मार्च १९७७ रोजी मुंबईतील एका पत्रकार परिषदेत ती बरखास्त केली असल्याचे घोषित करण्यात आले. दलित पँथरने जे महत्वाचे कार्य केले ते मे ७२ ते जून ७५ याच काळात. या काळात दलित पॅंथर हा एक झंझावात होता. या प्रभावशाली झंझावाताने पालापाचोळा उडवून लावला होता. वाढत्या अन्याय-अत्याचारांचा बीमोड करण्यास जन्मलेल्या या ज्वालाग्राही संघटनेने आंबेडकरी समाजात नवचैतन्य निर्माण केले. संघटनेचे रूपांतर खळखळत्या अन् सळसळत्या चळवळीमध्ये झाले अन् मग प्रत्येक तरूण हाच एक चळवळ झाला होता. बेभान झालेला हा तरूण रस्त्यात लढत होता. व्यवस्थेशी टक्कर घेत होता. अभावग्रस्तांना दिलासा देत होता. अन्यायी प्रवृत्तीची नांगी ठेचत होता. हा इवलसा काळ परंतु त्यांनी शासनाला जाग आणली. राजकीय पक्षांना भानावर आणले. दीनदुबळ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. त्यांना दूरापास्त असलेला न्याय मिळवून दिला. दलित पँथरचा हा लढा केवळ संपत्तीसाठी नव्हता. तो होता घटनात्मक अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी, तो होता समतेची प्रस्थापना करण्यासाठी, तो होता स्वातंत्र्याचे मोल जपण्यासाठी, तो होता एकूणच समाजात बंधुभावना निर्माण करण्यासाठी, तो होता माणसाला माणूसपण बहाल करण्यासाठी, तो होता माणसामाणसातील दरी मिटविण्यासाठी, वर्णव्यवस्थेचा डोलारा नष्ट करण्यासाठी आणि हे कार्य दलित पँथरने यशस्वीरीत्या केलेले आढळते. त्यामुळे आज ही खैरलांजी सारखे प्रकार



 ©EIJMR, All rights reserved.

घडले की वाटते 'दलित पँथर' सारखी संघटना असावी. ही संघटना उदय होण्याची कारणे पुढील प्रमाणे.

**उदयाची कारणे :**

खेडे म्हणजे जातीयतेचा उकिरडा असे डॉ. बाबासाहेब म्हणायचे. डॉ. बाबासाहेबांच्या आदेशाप्रमाणे काही लोकांनी हे उकिरडे नाकारले. परंतु बहूतांश दलित खेड्यातच राहत होता. तो सवर्णांच्या अत्याचारास प्रतिकार करण्यास असमर्थ असलेला असहाय्य माणूस गावाच्या वेशीत तुरूंगवास भोगीत होता. धनदांडग्यांनी आणि अहंकारी जातीयवाद्यांनी खेडे हे लक्ष्य ठरविल्यामुळे अन्याय अत्याचारांना खेड्यामध्ये उधान आले. आंबेडकरी समाजावर अन्याय होतच नव्हते असे नाही. खेड्यातील गावगाड्यांसमोर जे नस्तमस्तक होत होते त्यांच्यावर अन्याय होत नव्हते. बौद्धांना गावगाड्यात पारंपारिक व्यवसाय नव्हता त्यामुळे मोलमजुरीसाठी गावकऱ्यांवरच अवलंबून रहावे लागे. अन्याय करण्यास क्षुल्लक कारणही पुरेसे असायचे, अन्याय झाला तरी त्याला वाचा फुटत नव्हती. कारण अन्याय करणारे आणि न्याय देणारे हे दोघेही सवर्ण हिंदु होते. एकमेकांचे हितसंबंध जोपासले जात होते. "त्यामुळे अन्यायाच्या प्रकारालाही गावाच्या तटबंधीत जेरबंद केले जायचे. गावकूस तोडून एखादी बातमी बाहेर पडली तर त्यांची किंमत सर्वच दलितांना भोगावी लागत असे. बहिष्कार हे असेच अस्त्र होते. ह्या अस्त्रामुळे दलितांच्या जीवनाची कोंडी केली जायची. त्यांना मोलमजुरी देण्यास मज्जाव होत असल्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा भागत नव्हत्या. सवर्णांच्या जागेत माणसानाच नव्हे तर पशुनाही फिरकण्यास प्रतिबंध करण्यास येत होता. पोराबाळांची आबाळ व्हायची. जीव भूकेने तडफडायचे. अर्भकांच्या किंकाळ्या कच्च्या घरात विरघळून जायच्या. जीवघेण्या त्या क्रूर बहिष्काराला सामोरे जायला लागू नये म्हणून अनेक अत्याचार दातओठ खात विरले जायचे. अभावग्रस्त समाज आता अन्यायग्रस्त झाला होता. कोरड्या सहानुभूतीला सुद्धा महाग झाला होता."[१] या संदर्भात विस्ताराने माहिती देतांना शंकरराव खरात म्हणतात, "त्या काळात



 ©EIJMR, All rights reserved.

खेडोपाडी दलितांवर अन्याय-अत्याचार होत होते. ते अधिकच वाढत चालले होते. या अत्याचारांचे स्वरूप ही भयंकर असत. दलित व्यक्तींना जीवंत जाळणे, दलित कुटुंबियांना घरात कोंडणं, दलितांची घरे-वस्त्या, पेटविणे, त्यांना मारपिट करणं, त्यांचे खुन करणं, दलितांच्या पाणी पिण्याच्या विहिरीत विष्ठा, घाण टाकणे, त्यांच्या जमिन शेतीतील उभी पिकं दांडगाईनं कापूण नेणं, त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांच्या दैनंदिन जीवनाची कोंडी करणं, दलित स्त्रियांचा विनयभंग करणं, त्यांची जबरदस्तीनं अब्रु घेणं, अस्पृश्य म्हणून गुलामगिरीची कामं करण्याबद्दल त्यांच्यावर दंडेलिने रुढी परंपरचे दडपण आणून जबरदस्ती करणं."[२] हे व अशाचप्रकारचे दलितांवर अन्याय व अत्याचार होत होते. "तत्त्कालीन रिपब्लिकन नेतृत्त्व ह्या परिस्थितीकडे लक्ष देत नव्हते. सत्ता सहभागात ते नेतृत्त्व मश्गुल झाले होते. रिपब्लिकन पक्षाच्या स्वार्थी नेतृत्त्वामुळे हा पक्ष आपला नाही, अशी भावना तरूणात निर्माण होऊ लागली. आपल्यावरील या गुलामगिरी विरूद्ध त्याने दाद कोणाकडे मागावी? त्याच्या संरक्षणाची जबाबदारी ज्यांच्याकडे होती. ते रिपब्लिकन पक्षाचे नेते व त्यांची तळी उचलून धरणारे अनुयायी आपापसात लढत होते.

दलितांवरील होणाऱ्या अत्याचाराची माहिती गोळा करण्यासाठी सरकारने जी समिती नेमली, त्यात एलिया पेरूमल हे समितीचे अध्यक्ष होते. सर्वपक्षिय सदस्यांपैकी रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधीत्व दादासाहेब गायकवाड यांनी केले. दादासाहेब अनुभवसंपन्न असल्यामुळे त्यांचीच या अहवालावर जास्त छाप होती. अमेरिकेतील निग्रोवर केलेल्या अन्यायाचे संकलन प्रसिद्ध झाल्यावर त्या अन्यायाची तीव्रता कळली, तसेच "या पेरूमल समितीचे झाले. या समितीने जातीयवाद्यांचा नंगानाच खुलेआम लोकांसमोर आणला. पुरोगामी म्हणविणाऱ्या लोकांच्याही डोळ्यात अंजन टाकणारा हा अहवाल ठरला. काँग्रेसच्या गुंडशाहीचे, जमीनदारांच्या गुंडशाहीचे दर्शन या अहवालामध्ये झाले. हा अहवाल पाहिल्यावर अनेक दलित तरूणांच्या डोळ्यात रक्त उतरले. त्यांच्या मूठी आवळू लागल्या. या अहवालात अहवालीय वर्षात देशभर ११७७ दलितांचे खुन झाल्याचे नोंदविण्यात आले होते. प्रत्यक्षात ही संख्या ११

हजारापेक्षाही जास्त होती, दलित स्त्रियांवर बलात्कार झाल्याचे, त्यांची नग्न धिंड काढण्याचे, पाणवठे बाटविले म्हणून बेदम मारहाण करणारे, पाटलांसमोर अद्यायावत कपड्यात वावरला म्हणून चाबकाचे फटके खाणारे, पायात चप्पल घातली म्हणून चपलेने तोंड फोडणारे, जमिन मागणारे, मजूरांना कायमचे दास्यात ठेवणारे, दलितांच्या पाणवठ्यावर विष्ठा टाकणारे असे अनेक प्रकार नोंदविण्यात आले होते. बहिष्कारासारखे खेड्यातल्या सिमेत विरणारे तसेच शहरातील सुप्त जातीयता यांचे चित्रण या अहवालात होते."[३]

"डॉ. बाबासाहेब प्रमाण मानून पक्षविरहीत अशी एक संघटना कार्यरत झाली. या संघटनेचे नाव होते. युवक आघाडी अन् तिचे मध्यवर्ती कार्यालय होते सिद्धार्थ विहार, वडाळा या संघटनेत भगवान वाघमारे (झरेकर), राजाभाऊ ढाले, डी. जी. जाधव, अर्जुन डांगळे, चिंतामणी जावळे, हिरामण बोंढारे, विनायक रांजणे, माधव धिवार, सुधाकर हडवळकर, वसंत कांबळे वगैरे तरूण कार्यरत होते. म्हणजे युवक क्रांती दल, समाजवादी युवक सभा व रिपब्लिकन क्रांती दल या संघटना कार्यरत होत्या."[४] या सर्व संघटना आपापल्या परीने दलितांवरील अन्याय निवारण करण्याचे प्रयत्न करीत होत्या. परंतु एकूणच त्यांचे प्रयत्न अपूरे होते, त्यामुळे त्या तरूणांना 'ब्लॅक पँथर' सारख्या संघटनेची आवश्यकता भासली व त्यातून 'दलित पँथर' चा जन्म झाला.

पेरूमल कमिटी अहवाल, बावडा येथील सवर्णांकडून दलितांवर टाकलेला सामुहिक बहिष्कार ब्राह्मणगाव येथील स्त्रीयांची नग्न धींड आदर्शावर केलेला हल्ला ह्या गोष्टी ताज्या असतांना शासन त्यावर ठोस कृती करीत नव्हते. त्यामुळे दलित साहित्यिकांनी सरकारला इशारा देणारे पत्रक काढले. त्या पत्रकात दलित साहित्यिकांनी महाराष्ट्र सरकारला असे बजावले होते की, "महाराष्ट्राच्या अनेक खेड्यापाड्यांमध्ये सवर्णांकडून दलित समाजावर होणारे अमानुष अन्याय अत्याचार हे जर शासनाने त्वरित कारवाई करून थांबविले नाहीत तर आम्हा दलित साहित्यिकांना लेखण्या मोडून शस्त्रे हाती घ्यावी लागतील आणि त्यातून



 ©EIJMR, All rights reserved.

पूढे उद्‌भवणाऱ्या परिणामांची जबाबदारी संपूर्णपणे शासनावर राहील."[५] ह्या पत्रकावर ज्या नऊ साहित्यिकांनी सह्या केल्या त्यांची नावे अशी - राजा ढाले, नामदेव ढसाळ, अर्जून डांगळे, भीमराव शिवराळे, उमाकांत रणधीर, गंगाधर पानतावणे, वामन निंबाळकर, मोरेश्वर वहाणे आणि ज. वि. पवार हे पत्रक अनेक वर्तमानपत्रात २६ मे १९७२ रोजी छापून आले. यामधील काही साहित्यिकांनी दलित पँथरची स्थापना केली. पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका अंतर्गत बावडा या गावी स्पृश्यांनी अस्पृश्यावर पुकारलेल्या बहिष्कारांमुळे सामाजिक जीवनात घुसळण सुरू झाली. सरकार या प्रकारच्या गुन्हेगारांना पाठीशी घालीत आहे, असा समज दृढ झाला. कारण हा बहिष्कार ज्या शहाजीराव पाटील यांनी पुकारला होता. त्या पाटलांचे भाऊ शंकरराव बाजीराव पाटील हे महाराष्ट्र सरकारच्या मंत्रीमंडळात सदस्य होते. राज्यमंत्री असलेल्या शंकरराव पाटलांनी राजीनामा द्यावा, अशी चहूबाजूने मागणी होत असतानाच परभणी जिल्ह्यातील ब्राह्मणगाव येथे माणुसकीला कलंक लावणारा प्रकार घडला. "दिनांक १४ मे १९७२ या दिवशी बौद्धवाड्यातील दोन स्त्रियांची नग्न धिंड काढण्यात आली. तहानेने व्याकुळ झालेल्या या दोन भगिनीचा गुन्हा म्हणजे गावगुंड सोपान दाजीबा यांच्या विहीरीवर पाणी पिण्याचा प्रयत्न करणे. त्या भगीनींना आपली तृष्णा भागविता आली नाहीच. उलट त्या दोघींची वस्त्रे फेडून त्यांना नग्न करून त्यांच्या गुप्तागांवर बाभळीच्या काट्याचे फटके मारीत गावभर फिरविण्यात आले."[६] अस्पृश्यता ही मानव जातीला लागलेली किड तिचे भीषन रौद्ररूप पाहून दलित तरूण अस्वस्थ झाला.

**दलित पँथरची स्थापना :**

ज. वि. पवार 'दलित पँथर' च्या जन्माच्या हकीकती विषयी सांगतात, "२९ मे १९७२. नामदेव माझ्या घरी आला. टॉयफॉईडने अशक्तपणा वाढल्यामुळे ऑफिसला जाताना अलंकार सिनेमाच्या बाजूने विठ्ठलभाई पटेल मार्गाने ऑपेरा हाऊसकडे जाण्यासाठी आम्ही दोघे पायीच निघालो. अलंकारजवळ मोसंबी रस प्यायलो. रस्त्यांने चालतांना आमची सिद्धार्थ

विहारमधील बैठकीवरच चर्चा होत होती. युवक आघाडीच्या बैठकातून आम्ही बाहेर पडलो होतो. आता करायचे काय? अलंकार सिनेमा ते ऑपेरा हाऊस येथील माझे बँक कार्यालय या दरम्यान रस्त्यातच एखादी जहाल संघटना स्थापन करावी अन् तिच्या मार्फत अन्याय अत्याचारांना पायबंद घालावा असा आम्ही निर्णय घेतला. नावासाठी अडणारा मी नव्हतो. परंतु नावात वेगळेपणा असावा असा नामदेवचा आग्रह होता अखेर हे नको ते नको करता करता दलित पँथर हे नाव ठेवण्याचे निश्चित झाले. म्हणजे दलित पँथरचा जन्म हा रस्त्यात झाल्यामुळे तिने लढे उभारले, ते सुद्धा रस्त्यातच उतरून. संघटना स्थापन करायचा निर्णय झाला. आता त्याची प्रसिद्धी होणे आवश्यक होते. नामदेवचे समाजवादी मंडळीशी संबंध होते. समाजवाद्यांच्या कामगार संघटनांचे कार्यालय राजाराममोहन रॉय मार्गावर होते. माझ्या कार्यालया शेजारीच. या कार्यालयात कवी रमेश समर्थ टायपिस्ट होते. त्यांच्या 'लखलखत्या भाकरी' या काव्यसंग्राहामुळे ते माझ्याही परिचयाचे होते. ढसाळ सरळ समर्थांकडे गेले. दलितांवरील अन्याय अत्याचारांचा मुकाबला करण्यासाठी दलित पँथर ही संघटना स्थापन झाल्याचे वृत्त त्यांनी समर्थांकडून टाईप करून घेतले, अन् सहीसाठी माझ्याकडे आणले. वर्तमानपत्रासाठी तयार करण्यात आलेल्या त्या वृत्तावर पहिली सही होती ज.वि.पवार तर दुसरी होती नामदेव ढसाळ, नामदेवानी स्वत:चं बातमी वर्तमान पत्राकडे नेऊन दिली. त्यापैकी मराठा, नवाकाळ, संध्याकाळ व नवशक्ती या वर्तमानपत्रांनी वेगवेगळ्या तारखांना ते वृत्त प्रकाशित केले. काहींनी ३० मे रोजी. वर्तमानपत्राच्या कोपऱ्यात प्रसिद्ध झालेल्या त्या बातमीचा कोणीही गांभीर्याने विचार केला नाही. मुंबई पोलिसांच्या दृष्टीने आणखी एक संघटना एवढेच तिचे मूल्य होते."[७] अशाप्रकारे दलित पँथरची स्थापना झाली.

**दलित पँथरने दिलेला लढा :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४८ साली संसदेत भारतीय राजकर्त्यांना एक इशारा दिला होता की, "उद्या दलितांना शोषितांना नागवले गेले, त्यांचे सर्वांगीण स्वातंत्र्य हिरावून



 ©EIJMR, All rights reserved.

घेतले गेले व बहुसंख्यांक मंडळींनी अन्यायाचे सत्र चालु ठेवले तर एक दिवस हिच पिडीत जनता रस्त्यावर येईल ती सर्वकष बदल मागेल, ती सशस्त्र लढा पुकारेल अन् तेंव्हा त्यांचे काहीच चुकलेले नसेल." डॉ. बाबासाहेबांच्या या इशाऱ्याचा शासनाने गंभीर दखल घेण्याऐवजी शासनकर्ते दलितांना छळतात हे उमजून चुकताच दलित पँथरने उग्र रूप धारण केले व अन्यायाचे निदलिन करण्यास तरूणांना रस्त्यावर उतरविले. "अत्याचार घडला की, त्या गावी अत्याचारी शक्तींना ठेचणे, दलितांना अभय देणे. असली कामे दलित पँथर करीत होती. या दृष्टीने पिसे गावातील प्रवेश हा उल्लेखनिय झाला. ठाणे जिल्ह्यातील ह्या गावी राजा ढाले, महातेकर, प्रभू मोरे, अनंत बच्छाव वगैरे मंडळींनी एक वेगळे वातावरण निर्माण केले. तेथील गावगुंडांला जेरीला आणले. गावातील 'दादा' पँथरच्या पाया पडले. पँथर मंडळी गावात जावून आपले कार्य पार पाडीत आहेत. यांची कुणकुण पोलिसांना लागताच पोलिसांचे एक पथक पिसे गावी उतरले पण पँथरच्या तरूणांपुढे पोलिस यंत्रणेला मुग गिळून बसावे लागले."[८]

पुणे शहरासाठी जाहीर सभा घेण्यास मुंबईहून काही तरूण निघाले त्याच दिवशी ठाणे जिल्ह्यातील "चावे गावात काही तरूण गेले चावे गावातील अत्याचारी शक्तींना पाठीशी घालणाऱ्या संबंधितांना पँथर मंडळीने ठाणे जिल्ह्यात प्रवेश केल्याचे कळताच घरदार सोडून जावे लागले. पोलीस पाटील ही गाव सोडून पळण्याच्या मार्गावर असतांना त्याला पकडले गेले. त्याचा योग्य तो समाचार घेण्यात आला. दादाभाऊ साळवेंनी पाटलाची बोबडी वळवली. त्या दिवसापर्यंत पाटलाने ओरडायचे अन दुसऱ्यांनी माना खाली घालून हुकूमाचे दावेदार व्हायचे हा रिवाज. परंतु त्या दिवशी दलित पँथरच्या तरूणांनी ओरडायचे आणि घाबरलेल्या पाटलाने ऐकायचे. पाटलांच्या आयुष्यातील तो पहिलाच दिवस. चावे गावचे प्रकरण हाताळणारी काही मंडळी ठाण्यात, काही तरूण पूण्याच्या जाहीर सभेला तर काही मंडळी पुणे जिल्ह्यातील पेठ या गावात, पँथरमध्ये उक्ती आणि कृती यांचा समन्वय साधला जातो तो असा."[९] "१४ डिसेंबर १९७२ रोजी पुणे जिल्ह्यातील भूगाव या गावी तालुका मुळशी मालन

हरिभाऊ जगताप नावाच्या महिलेवर झालेल्या बलात्कारासंदर्भात आणि तिचा मृत्यु झाल्यावर दिनांक २६ डिसेंबर १९७२ रोजी पुणे दलित पँथरने उग्र आंदोलन उभारले. पुणे दलित पँथरचे शेकडो तरुण अनिल कांबळे, जयदेव गायकवाड, एल. डी. भोसले यांच्यासह एका मोर्चाने भूगावात प्रवेशकर्ते झाले. दलित पँथरची आक्रमकता पाहून गावचे महत्त्वाचे लोक आणि ग्राम पंचायतीचे सदस्य यांनी पँथरच्या नेत्यांची क्षमा मागीतली व अनर्थ टळला. भूगाव प्रकरणी अविनाश महातेकर यांनी खूप परिश्रम घेतले. एखाद्या खेड्यात टोळधाडीसारखे धावून जाणे व अत्याचारी शक्तींना नाक घासावयास लावणे यामुळे पुणे ग्रामीण विभागात दलित पँथरची एक लढाऊ संघटना अशी प्रतिमा झाली अन् त्यामुळे कित्येक प्रकरणे न्याय मिळवून देण्यासाठी पँथरकडे येऊ लागली."[१०] भूगाव प्रकरणी दलित पँथर व स्थानिक लोकांनी संयुक्तरित्या मालनच्या मृत्युला जबाबदार असणाऱ्याला कडक शासन करावे असा निर्णय घेतला. पुणे जिल्ह्यातील आसखेड, येणेरे, गोनवाडी गावातील पँथरचे कार्य सर्व जिल्हाभर पसरले. ह्या जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या हाडकी हाडोळीच्या जमिनी अनेकांनी बळकाविल्या होत्या. त्या जमिनी दलित पँथरने परत मिळवून दिल्या. सवर्णांमध्ये दलित पँथरची दहशत निर्माण झाली. अन्याय करतांना शंभर वेळा विचार त्यांना करावा लागत होता. कारण यावेळी संकटसमयी दलित पँथर धावून जात होती. न्याय मिळवून देत होती.

**दलित पँथरचे पतन :-**

अन्याय-अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी दलित पँथरची स्थापना समविचारी दलित तरूणांनी केली. या संघटनेने दलितांमध्ये स्वाभीमान जागृत केला. दलितांवरील अन्यायाचे निर्दालन केले. जिथे अन्याय होईल तिथे जाऊन अन्यायी शक्तीचे डोके ठेचले. अनेक दलितांना जमिनी मिळवून दिल्या. गावगाड्यात दहशत निर्माण केली. दलितांच्या हीन स्थितीला येथील धर्मग्रंथ जबाबदार असल्यामुळे त्या ग्रंथांची होळी केली. प्रतिगाम्यांवर सवर्णांवर वचक निर्माण केला. स्वातंत्र्य आमच्या झोपडीत आलेच नाही याची जाण



 ©EIJMR, All rights reserved.

सरकारला करून दिली. ह्यासाठी वेगवेगळी आंदोलने मोर्चे, सभा, घेतल्या. त्यासाठी तुरूंगवास सोसला. वरळी दंगलीनंतर अशाच प्रकारची संघटना आपल्या राज्यात असावी ह्यासाठी वेगवेगळ्या राज्यातून आमंत्रणे येऊ लागली. विदेशात विशेषतः इंग्लडमध्ये दलित पँथरची स्थापना झाली. हे होत असतांना रिपब्लिकन पक्षाप्रमाणे दलित पँथरचे दोन तुकडे पडले. दलित पँथरमध्ये फुट निर्माण झाली त्याची कारणे पुढीलप्रमाणे.

ज. वि. पवार त्याबद्दल सांगतात, "९ जुलै १९७२ च्या पहिल्या मेळाव्यापासूनच काही घटना मला आठवल्या. मुंबईमधल्या सभांच्या हॅंडबिल्सवर राजा ढाले यांच्या नावासमोर संस्थापक दलित पँथर असे काही कार्यकर्त्यांनी छापले होते. अशा प्रकारची एकदोन हॅंडबिल्स निघाल्यावर नामदेवने माझ्याकडे नापसंती व्यक्त केली नाही. परंतु त्यांची पुनरावृत्ती होऊ लागल्यावर एके दिवशी नामदेव धावत माझ्याकडे आला. त्याला वाटले मीच पत्रिकेचा नमुना तयार करून दिला असेल. त्याला मी समजावण्याचा प्रयत्न केला की आपण दोघे संस्थापक असलो तरी 'साधना' प्रकरणामुळे दलित पँथरला प्रसिद्धी मिळत आहे. प्रसिद्धी मिळायला ढाले यांचा लेखच कारणीभूत असेल तर त्यात वाईट वाटून घेण्यासारखे काय आहे? ढाले यांच्या मुळेच संघटनेचा वेलविस्तार होत आहे. ढसाळांच्या या प्रश्नाने मला कळून चुकले की नामदेवच्या मनात राजाबद्दल अढी निर्माण झाली आहे. म्हणजे मत्सर हेच या दुहीला प्राथमिक कारण होते. नामदेव दुखावला जात होता. परंतु त्याला ढाले जबाबदार नव्हते. नामदेव आपली नापसंती व्यक्त करू शकत नव्हता. कारण वर्तमानपत्राचा रेटा राजा ढाले यांच्या प्रसिद्धीला कारणीभूत होता. नामदेवला त्या मानाने प्रसिद्धी कमी मिळत होती."[११]

पँथर चळवळीचे संघटनापूर्व स्वरूप अगदी डोळ्यात भरण्यासारखे आहे. प्रारंभीच्या काळात चळवळीस प्रचंड पाठिंबा होता आणि बांधिलकी माणनारी नेतेमंडळीही होती. त्यांच्या कृतीचा प्रभावही लक्षणीय होता. तथापि संघटनेत निर्णयप्रक्रियेस आवश्यक अशी प्रभावी संरचना नव्हती. त्यामुळे सुव्यवस्थीत संरचनेअभावी धोरणात्मक निर्णयाची अमंलबजावणी



 ©EIJMR, All rights reserved.

होण्यात अनंत अडचणी उभ्या राहील्या. ह्यावरूनच संघटनापूर्व स्वरूप स्पष्ट होते. संघटना उभारण्याऐवजी प्रचार, बैठका, मोर्चे आणि अत्याचारांविरूद्ध प्रतिहल्ले ह्यावर जास्त भर दिला गेला. वैचारीक गोंधळ आणि पोलिसांची दडपशाही त्यामुळे ही बंडखोरी चळवळ संघटनापूर्व अवस्था ओलांडू शकली नाही. परिणामी चळवळीचा धोरणात्मक प्रभाव जसा पडतो तसा पँथर चळवळीवर नियंत्रण ठेवणे कठीण गेले. निर्णयप्रक्रियेचे निश्चित मार्ग अनुपलब्ध असताना नेते व अनुयायी ह्यांना संघटित करणारा एकमेव घटक म्हणजे आंबेडकरांची विचारसणी हा होता.

'ब्लॅक पँथर' ने नव्या सदस्यांना प्रवेश देतांना जशी बारीक छाननी केली तशी पद्धतशीर छाननी दलित पँथरने कधी केली नाही. नवसदस्यांना प्रवेश देतांना स्थानिक नेत्यांनी दक्ष राहावे. ह्यावर ब्लॅक पँथर दोन कारणास्तव भर देते. एक म्हणजे सदस्यसंख्या नियंत्रणाबाहेर फुगत गेली की त्यांना संघटनेच्या वैचारीक भूमीकेचे शिक्षण- प्रशिक्षण देणेही कठीण होऊन बसते. दुसरे म्हणजे छाननी न करता मोठ्या प्रमाणात सदस्यत्व दिले तर पोलिसांचे हस्तक व इतर व्यक्तींची घुसखोरी होण्याची शक्यता वाढते. वैचारीक प्रशिक्षणाच्या अभावी दलित पँथर संघटनेतील नवसदस्यांचा भरणा समस्याभूत झाला. विविध थरातील पदाधिकारी प्रशिक्षण उभारणी कार्यक्रम पँथरने हाती घेतला नाही. पद्धतशीर सदस्यत्व व वैचारीक प्रशिक्षण ह्यामुळे संघटनेतील सदस्य संघटीत राहतात. दलित पँथरमध्ये ह्या दोन्ही घटकांचा अभाव होता.

मुख्य राजकीय पक्षांच्या नेत्यांना दलितांचे वाढते ऐक्य व सामर्थ्य जाणवले तेव्हा त्यांच्या विचारसरणीशी जवळीक असणाऱ्या पँथर गटाशी संधान बांधून त्यांना आपल्या बाजुला करून घेण्याचा प्रयत्न केला. सर्व राजकीय पक्षांना दलित पँथर चळवळीचा स्वतः च्या वाढीसाठी केवळ खाद्य म्हणून वापर करावयाचा होता. त्यासाठी त्यांची जोरदार रस्सीखेच चालू होती. त्यांच्या सुंदोपसुंदीने पँथर चळवळ फुटली. नेतृत्वामध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न वृत्तपत्रांनी

केला असे दिसते. उदाहरणार्थ, महाराष्ट्र टाईम्सने ढसाळांच्या भाषणाला वाजवीपेक्षा जास्त महत्व दिले व त्यांच्या तोंडी वाक्ये घातली, 'मी हाडाचा कम्युनिस्ट आहे,' हे वाक्य संपूर्ण तया संदर्भविरहीत होते, पण ढसाळांच्या विरोधी लोकमत निर्माण करण्यास ते उपकारक ठरले."[१२] यावरून असा निष्कर्ष सहजपणे काढता येईल की तत्कालीन राजकीय पक्षांचा चळवळीत फुट पाडण्यात अत्यंत महत्वाचा वाटा होता. त्याचबरोबर वर्तमानपत्रांनी सुध्दा दिलेल्या वेगवेगळ्या बातम्यांमुळे संघटन फुटण्यास मदतच झाली.

ढाले व ढसाळ यांचे व्यक्तीमत्व मुळातच अत्यंत भिन्न होते. "ढाले बुद्ध-आंबेडकरवादाचे निष्ठावान होते. संसदीय लोकशाहीकडे त्यांचा जास्त कल होता. 'सांस्कृतीक क्रांती आणि बौद्धवादाच्या प्रचाराने जातिनिर्मूलन' याला त्यांनी सर्वात जास्त प्राधान्य दिले होते. याउलट ढसाळ यांची प्रवृती बंडखोराची होती. वर्गसंघर्षाला जातीय संघर्षाची जोड देऊन मौलिक परिवर्तन करण्याच्या क्रांतीकारी मार्गास ते अनुकुल होते. सुरूवातीपासून या दोन अत्यंत भिन्न व्यक्तींच्या प्रवृती जाणवत होत्या, स्पष्ट होत्या. ढाले दलित पँथर चळवळ म्हणजे केवळ नवबौद्धांची बनवीत असल्याचा आरोप ढसाळ करीत होते, तर ढसाळ आंबेडकरवादाच्या बूरख्याखाली मार्क्सवादाचा प्रसार करीत असल्याचे आरोप ढाले करीत होते.

"थोड्या काळात चळवळीचा प्रसार करण्याच्या घाईगडबडीत नेत्यांनी भक्कम आधारावर चळवळ उभी करण्याकडे दुर्लक्षच केले. आता तत्कालीन सामाजिक परिस्थितीही अशी होती. की सर्वच राजकीय कृतींबाबत मोठा वैचारिक गोंधळ होता. त्याशिवाय फुटीचे कारण म्हणजे आर्थिक गैरव्यवस्थापन, वरळीच्या निवडणूकीनंतर पँथर्स राजकारणात उतरले अन् त्यांच्या राजकीय क्रयमूल्यांची भाषा सुरू झाली. या काळातील आर्थिक व्यवहारांनी कार्यकर्त्यांच्या मनात संशय निर्माण झाला. प्राथमिक अवस्थेत डाव्यांनी व हितचिंतकांनी आर्थिक मदत देऊ केली. पोस्टर्स, हँन्डबिले इत्यादी कामासाठी पाचही नेत्यांना ते पैसे देत.



 ©EIJMR, All rights reserved.

वरळी दंगलीनंतर आर्थिक मदत भरधोस मिळाली. ओव्हल मैदानावर २१ जानेवारी १९७४ ला झालेल्या जाहीर सभेत ढसाळांना सर्व तरुण संघटनांतर्फे थैली अर्पण करण्यात आली. गोळा केलेल्या निधीची नोंद नेते मंडळीनी कधीही ठेवली नव्हती. संघटनेच्या कामाकरिता हा पैसा वापरला जात नसल्याचा आरोप केला गेला. असुरक्षित जीवन आणि आर्थिक दुर्बलता, यामुळेही कदचित नेत्यांना हा निधी खाजगी गरजा पुर्ण करण्यासाठी वापरावा लागला असेल. हे स्पष्टीकरण देऊन कोणताही नेता मोकळा होऊ शकत नाही. पैशाच्या गैरव्यवरहारामुळे नेत्यांमध्ये परस्पराविषयी गैरसमजुत व संशय निर्माण झाला."[१३] याचेच पर्यावसन संघटना फुटीत झाला. अशाप्रकारे संघटना चालविण्यासाठी जो पैसा लागतो त्याचे नियोजन पँथर नेत्यांनी केलेले दिसत नाही.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी घटनात्मक तरतूदी केल्या, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर दलित समाजामध्ये अन्याय अत्याचारात भर पडतांना दिसते. तो अन्याय अत्याचार दलित पँथरने दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी सरकारला बाध्य केले. दिन-दुबळ्या समाजावरील अन्याय दूर केला. परंतु नेतेपणाची डोक्यात शिरलेली हवा, अंतर्गत मतभेद, मार्कसवाद की आंबेडकरवाद, संघटन बांधणीकडे दुर्लक्ष इत्यादी कारणांमुळे वरील दलित पँथर संघटना अल्पावधीतच नाश पावली. आजही खैरलांजी, भिमाकोरेगाव सारखे प्रकार पाहिले की वाटते, दलित पँथरसारखी संघटना असावी.



 ©EIJMR, All rights reserved.

**संदर्भ ग्रंथ :**


१) पवार ज. वि.- आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड ४, अस्मिता कम्युनिकेशन मुंबई, पृ. क्र. १३

२) खरात शंकरराव - तराळ - अंतराळ, कान्टिनेंटल प्रकाशन पुणे, १९८८, पृष्ठ क्रमांक ४६९

३) पवार ज. वि.-आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड ४, पृष्ठ क्रमांक १३

४) पवार ज. वि.- आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड ४, अस्मिता कम्युनिकेशन मुंबई, पृष्ठ क्रमांक १९

५) लिंबाळे शरणकुमार - दलित पँथर, दिलीपराज प्रकाशन पूणे, पृष्ठ क्रमांक ८१

६) पवार ज. वि.- आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड ४, पृष्ठ क्रमांक ३५

७) लिंबाळे शरणकुमार - दलित पँथर, दिलीपराज प्रकाशन पूणे, पृष्ठ क्रमांक ८१

८) पवार ज. वि. -मुंबईतील तरूणांच्या शौर्याचा आलेख, ज्ञानमुद्रा प्रकाशन वडाळा, पृ. क्र. ५

९) कित्ता - पृष्ठ क्रमांक ०५

१०) कित्ता - पृष्ठ क्रमांक ०६

११) पवार ज. वि.- आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड ४, पृष्ठ क्रमांक २१६-२१७

१२) शेख मलिका अमर (संपादक)- दलित पँथर : एक संघर्ष, भाष्य प्रकाशन मुंबई, पृष्ठ क्र. ६६-६७

१३) शेख मलिका अमर (संपादक)- दलित पँथर : एक संघर्ष, भाष्य प्रकाशन मुंबई, पृष्ठ क्र. ६८




 ©EIJMR, All rights reserved.